RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# मराठवाड्यातील मंदिरावरील प्रसव शिल्पातील वैज्ञानिकता

**प्रा.डॉ. अरविंद सोनटक्के**
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर . ता. भोकर जि. नांदेड

---

मूर्ती या शोभेच्या जितक्या असतात, त्याहून त्या पूजेसाठी जास्त असतात. कोण्या तरी एका अतिप्राचीन काळी मानव हा संस्कृतीच्या अगदी प्राथमिक अवस्थेत होता. पण तशा त्या आदिम अवस्थेत त्याने देव नावाची वस्तू शोधून काढली. देवाची शक्ती प्रचंड आहे, हे त्याने जाणले. ही दैवी शक्ती आणि भूत, प्रेत, पिशाच्य इत्यादी दानवी शक्ती या दोन्ही प्रकारच्या शक्ती सजीव प्राण्यात व निर्जीव वस्तूंतही वास्तव्य करतात असे त्याला भावले. त्या भावनेतूनच तो डोंगर, नद्या, पशू, पक्षी, मोठ - मोठे पाषाण यांची पूजा करु लागला. या वस्तूंना आणि प्राण्यांना आपल्या बऱ्या भल्यासाठी प्रार्थना करु लागला. त्या मानवाने प्रतीकरुपाने सुरु केलेली ही देव पुजा होती.

हळूहळू माणसाची बुध्दी विकसित होऊ लागली, तसतशा त्याच्या देव- दानव विषयक कल्पना आकार घेऊ लागल्या. देवाचे पुसटसे का होईना, पण रुप त्याच्या डोळ्यापूढे तरळू लागले. त्याला जो देव दिसला, भावला, तो अर्थातच मानवरुपातच होता.आपल्या हाता पायाचे आणि ज्ञानेंद्रियांचे सामर्थ्य त्याला ज्ञात होते. ते साधर्म्य त्याने देवाच्या बाबतीत अनंतपटीने वाढविले आणि त्या स्वरुपात देव पाहिला. मग त्या मानवाला वाटले की, या देवाची मूर्ती घडवावी.त्यासाठी त्याने मानवी आकृतीचीच योजना केली. चांगल्या व अनुकूल देवतांच्या मूर्ती मानसाने सौम्य - सुंदर बनविल्या आणि दानवांच्या मूर्ती भयानक स्वरुपात घडविल्या. तो देवांची पुजा आपल्या कल्याणासाठी करु लागला आणि दानवांची पुजा, त्याने आपल्यावर संकटे आणू नयेत म्हणून करु लागला.[1] मूर्तीपूजा हा काही फक्त हिंदू धर्मांचाच वारसा नाही. भारतात तसेच भारताबाहेरही अनेक खंडात लोक आपआपल्या धर्म संकल्पनेनुसार, लोकसमजूती नुसार देवतांच्या मूर्ती घडवताना व पुजताना दिसतात. भारतातील अनेक अनादी समाज प्रतीके आणि मूर्ती पूजन करीत होते.[2] शिल्प या संज्ञेचा अर्थ सामान्यपणे कोशल्यपूर्ण निर्मिती असा होतो. या शब्दाच्या वापरात नेमकेपणा येण्यासाठी वास्तुशिल्प, काष्ठशिल्प, शब्दशिल्प, स्वरशिल्प, मूर्तीशिल्प या सारख्या सामाजिक शब्दांचा उपयोग करण्यात येतो. शिल्पकला म्हणजे थोडक्यात 'मूर्तीकला' होय. 'मूर्ती' या शब्दाने विशिष्ठ व्यक्ती किंवा देवतेचे मूर्त स्वरुप व अनुकृती आणि सादृष्य या गोष्टी ध्वनीत होतात. 'मूर्ती' व 'प्रतिमा' यात अंतर असून 'मूर्ती' ही सामाण्य मनुष्याची किंवा प्राण्यांची प्रतिकृती असते. मात्र 'प्रतिमा' या शब्दाचा उल्लेख देवी, देवता, महात्मा, स्वर्गवासी व्यक्तींच्या संदर्भात केला जातो. 'प्रतिमा' म्हणजे 'प्रतिरुप' (समान आकृती) 'प्रतिकृती', 'प्रतिबिंब' होय. पाणिनीने समान आकृतीसाठी प्रतिकृती या शब्दाचा उपयोग केला आहे. प्राचीन काळात वैदिक काळापासून 'प्रतिमा' शब्दाचा प्रयोग चालत आलेला आहे. यज्ञाच्या स्वरुपाच्या संदर्भात ऋग्वेदात 'प्रतिमा' हा शब्द प्रयुक्त झालेला आहे. ऋग्वेदात 'प्रतिमा' साठी 'अर्च्चा' या शब्दाचा प्रयोग केलेला आहे.हिंदू धर्मात शिल्प स्वरुपात विविधांगी भावनांचा कल्लोळ करण्यात आला आहे. स्वैरपणा व कल्पनेची भरारी मूर्तीकामाच्या निमित्ताने जाणवते. प्राच्यविद्या अभ्यासकांच्या मते 'शिल्प' या शब्दाचा मूळ अर्थ आश्चर्यकारक किंवा अद्‌भूत कार्य, त्याचा प्रत्यय मूर्ती शिल्पावशेषावरुन स्पष्ट करता येतो.[3]

मूर्तीशास्त्रात पौराणिक संदर्भ त्यातील कथानक जुळवून पहावे लागते. मनुष्याने आपल्या मनातील संकल्पना या प्रतीकरुपाने प्रत्यक्षात साकार करण्यासाठी विविध कलांचा आश्रय घेतला.माणसाने कला निर्माण केली आणि हिच कला माणसाच्या अस्तीत्वाची ओळख झाली. त्या कलेने हळू हळू मानवी मनाचे पैलू प्रतीक रुपाने मानवी जीवनात अंकीत करण्यास प्रारंभ केला आणि त्यातूनच धर्मशास्त्राने 64 कलेला मान्यता दिली. विविध कलांमधून मूर्तीकला ही एक शक्तीशाली माध्यम म्हणून वापरले गेले. ईश्वर आणि धर्म या संकल्पनेचा जन्म होण्यापूर्वी मूर्तीकलेने जन्म घेतलेला होता.जितका कालावधी मानवी सभ्यता उदयास येण्यासाठी लागला. तेवढाच वेळ मूर्तीकलेत सुघडता येण्यासाठी लागलेला आहे. आपल्या कल्पना व भावनेला आत्मीयरुप प्रदान करताना मनुष्याने अज्ञात ईश्वरासही मनुष्याकार तयार केले. कलाकार कलेत एवढे एकरुप झाले की, न पाहिलेले ईश्वर, बुध्द, महावीराचे रुप त्याने स्वतःच्या कल्पनेने साकारले आणि त्यास जनमान्यताही मिळाली.[4]

या मानवीय कल्पनेनेच ब्रम्हा, विष्णु, महेश निर्मिले.त्याच प्रमाणे बुध्दजन्म - जन्मांतराच्या कथाही निर्माण केल्या, ज्या पध्दतीने सृष्टीत सृजन आणि विनाश, जीवन व मृत्यूचे शाश्वत नृत्य पाहिले त्याच संकल्पनेतून नटराज तयार केला.[5] मानवाने धरतीवर पाऊल ठेवले तेव्हापासूनच समाज आणि संस्कृतीचा विकास करीत आला आहे. हा संस्कृतिक प्रवास केवळ कलेच्या माध्यमातून आम्ही समजू शकतो. अंततः कला ही संस्कृतीच्या विकासाची सूचक आहे. तशीच ती भारतीय संस्कृतीला एक सूत्रात बांधण्याचे कार्य करणारी आहे. ही कला नेहमी मानवी जीवनासोबत असल्याने त्यात जीवन मूल्ये , संस्कार, धर्म , दर्शन, साहित्य, आचार विचार, विश्वास, मानवीय संवेदना या साऱ्या बाबी प्रतिबिम्बित होत आल्या आहेत.[6] भारतीय संस्कृतीच्या इतिहासा एवढाच कलेचा इतिहासही प्राचीन असून संस्कृती व कलेच्या इतिहासात मूर्तीशास्त्राचा समावेश केल्याशिवाय समग्र इतिहास मांडणे शक्य नाही. मूर्तीकलेतील बारकावे शोधण्यासाठी मूर्तीचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करावे लागेल. भारतीय इतिहास धर्मप्रधान असल्याने मूर्तीकलेवरही धर्मांचा प्रभाव दिसतो. मूर्तीशास्त्राचा अभ्यास करतांना धर्मांतील प्रतीकेही दृष्टीस पडतात. या प्रतिकांचा निर्मितीकाळ ठरविण्यासाठी पुरातत्वीय व पुराभिलेखीय शास्त्रांचा आधार निश्चितच [illegible] ठरु शकतो.

मानवी संस्कृतीच्या विकासा बरोबर त्याच्या निवासातही बदल झाला. शिकरीच्या ऐवजी शेती व पशुपालन उदर्निर्वाहाचे मुख्य साधन [illegible]ले. मानव शैलाश्रय सोडून सपाट मैदानात आला. त्याने राहण्यासाठी दगड, माती व लाकडाची घरे बनविली.संघटीत जीवनाची



Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

परंपरा सूरु झाली त्यातून गाव, पुर आणि नगरांचा जन्म झाला.हळूहळू आश्रय किंवा निवासाशिवाय पुजा अर्चेसाठी सुध्दा इमारतीची गरज वाटू लागली. त्यातूनच मंदिर ही संकल्पना उदयास आली.भारतीय मंदिर वास्तूचा इतिहास अत्यंत रोचक आहे.या देशातील साहित्यात मंदिराच्या बांधकामाविषयी अनेक उल्लेख उपलब्ध आहेत. पुरातात्विक अवशेषात मंदिराचे स्वरुप प्राचीन मूर्ती, नाणी, मुद्रा वगैरे पहावयास मिळतात. याच्या स्वरुपावरुन दिसते की, सुरवातीस मंदिर किंवा देवायतन साध्या स्वरुपात बनवत होते. सामान्य जमिनीपेक्षा काही इंच जागी प्रतिमा स्थापन करुन त्याच्या चारही बाजूला वेदिका किंवा कुंपण लावत असे. नंतर वेदिका वरतून सूध्दा झामून टाकत. प्राचीन आहत नाणी तसेच औदुंबर, पांचालांच्या मुद्रेवर मंदिराचे हे साधे रुप पहावयास मिळते.

मंदिराच्या आकार प्रकारासाठी मानवी शरीर, वृक्ष किंवा पर्वत शिखरापासून प्रेरणा घेण्यात आली. भारतीय परंपरेत आध्यात्मिक वा आधिभौतिक दृष्टीने मंदिराच्या मुळ रुपात याच साधनाचे निरुपण आढळते. शरीर सगुणात्मक देवतासाठी मानव रुपातून प्रेरणा घेणे स्वाभाविक होते.पावित्र्याचे प्रतिक म्हणून अनेक वृक्ष आणि पर्वत शिखरांनाही मंदिरासाठी प्रतिक मानण्यात आले.[7] मूर्तीपूजेच्या प्रथेतूनच मंदिर ही संकल्पना तयार झाली, या विषयी दुमत होण्याचे कांहीच कारण नाही. आपल्या देवतेला आपल्या प्रमाणेच आसरा असावा, घर असावे या भावनेतून मंदिर उभारण्याचे मानवाच्या डोक्यात आले असावे, असे अनुमान करावयास हवे. मंदिर या संकल्पनेची सूरुवात इ.स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या आधीचा पुरावा दृष्टिपथात येत नाही. मंदिराच्या इमारती या चौथ्या पाचव्या शतकातील गुप्त काळात निर्माण झाल्या आहेत. असे तज्ज्ञांचे मत आहे.[8] कालौघात मंदिर निर्माण शैलीत अमुलाग्र बदल घडून आला. मंदिर हे केवळ देवतांपुरते मर्यादित न रहाता मंदिराच्या बाह्यांगावर विविध मूतींचे अंकन व्हायला लागले.त्यातील कांही शिल्पे हे पौराणिक कथांवर आधारीत आहेत तर कांही सुरसुंदरीची आहेत.मराठवाड्यातील मंदिरांवरही अशी शिल्पे पहावयास मिळतात.त्यातील कांही मंदिराच्या बाह्यांगावर स्त्री प्रसव शिल्पे पहावयास मिळतात.

**1. धर्मापूरी**

केदारेश्वर हे मंदिर धर्मापुरी, ता. अंबेजोगाई जि. बीड येथे आहे. ते अंबेजोगाई पासून 30 किमी अंतरावर आहे.हे मंदिर एक शिवालय मंदिर आहे.मंदिराची निर्मिती 11 व्या शतकातील असावी.केदारेश्वर मंदिराची एकुण व्याप्ती 59 फूट लांबी, 48 फुट रुंदी अशी आहे. मंदिर नागर शैलीचे असून सध्या मंदिराचे मुखमंडप व अर्धमंडप पडलेले आहे.हे पश्चिमाभिमूख असलेले मंदिर सध्या देवकोष्टकाच्या बाजूने उघडले जात आहे. कारण जेथे मंदिराचे प्रवेश व्दार होते, पायऱ्या होत्या तेथे आता विहिर खोदण्यात आलेली आहे. सदरील मंदिराचा मंडप (सभामंडप) 30 फूट बाय 30 फूट असून अंतराळाची लांबी रुंदी 10 फूट बाय 10 फूट आहे. त्याच प्रमाणे गर्भगृह 10 फूट बाय 10 फूट आहे. गर्भगृहात शिवलिंग असून मंदिराचा बाह्यभाग अप्रतिम अशा शिल्पांनी सजलेला आहे.बाह्यभागावर नटेश्वर, मुरलीधर, विष्णू, नृसिंह, मदनिका, सुरसुंदरी, काली, ब्रम्हा, रती आणि मदन अशी एकूण 68 शिल्प शिल्पांकीत केलेले आहेत.[9] सदरील मंदिरावर उभ्या स्थितीत मूल प्रसवणारी तीन स्त्री शिल्पे आहेत.त्यातील एका शिल्पात स्त्रीने गुढघा जरा जास्तच वाकविलेला असून उर्वरीत दोन शिल्पात अर्थवट गूढघा वाकवून बाळाला जन्म देत असल्याचे शिल्प आहे.

**2.आमलेश्वर**

हे मंदिर अंबाजोगाई शहरापासून दोन किमी अंतरावर आहे.अंबाजोगाईतील विविध मंदिरामध्ये सकलेश्वर आणि आमलेश्वर मंदिरे ही तुलनेने पूर्व यादव काळातील (12 वे शतक) आहेत.आमलेश्वर मंदिर पूर्वाभिमुख आहे. सभामंडप, अंतराळ, आणि गर्भगृह आणि निरंधार प्रदक्षिणापथ आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूच्या अंतराळ व गर्भगृहाच्या मुळ शुष्करसांधी भिंती शाबूत आहेत. मंदिराच्या बाह्यांगावर सुरसुंदरी, वादक आणि सिध्द साधक कोरलेले आहेत. गजथरात विविध मुद्रेतील हत्तींचे शिल्पांकन झालेले आहे. तसेच त्यांच्याबरोबर लढणाऱ्या मनुष्याकृती, सिंह व घोड्याचे चित्रणही आहे. मंडोवरावर किर्तीमुख वा वेलबुटी नक्षी असलेले अर्धस्तंभ आहेत. आज मंदिराचे मूळ शिखर अस्तित्वात नसल्याने ते कसे असावे, याची कल्पना करणे अवघड आहे. मंदिराच्या आत व बाहेर पौराणिक कथानके असून शिवपार्वती दैत्य युध्द, गणपती, गजांतक शिव, सरस्वती, सप्तमातृकाही कोरलेल्या आहेत बाह्यांगावरील मर्कट आणि स्त्री, करपुर मंजिरी, पुत्रवल्लभा, नुपूरपादीका, शुक सारीका अशा कलात्मक सुरसुंदरी आढळतात.[10] या मंदीरावर अतिशय ओबडधोबड स्त्री प्रसव मुद्रेतील लघुप्रतिमा पाहावयास मिळते. ज्या मध्ये बाळाचा जन्म झाल्याचे स्पष्ट दिसते आहे.

**3.सकलेश्वर मंदीर**

सकलेश्वर मंदीरास 'बाराखांबी' मंदीर या नावाने ओळखले जाते. चालुक्य कालीन मंदीर स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून सकलेश्वर मंदीराची ओळख आहे.[11] सदरील मंदिराचे खोदकाम पुरातत्व विभागाच्यावतीने जाने. 2007 व मार्च 2018 मध्ये करण्यात आलेले असून या मंदिराची अधिकृत माहिती अजून प्रकाशित व्हायची आहे. सदरील मंदीराच्या उत्खननात एक उभ्या अवस्थेतील स्त्री प्रसवशिल्प उपलब्ध झालेले आहे.सदरील स्त्रीच्या बाजूला एक पुरुष बसलेला असून तो आकाराने बराचा मोठा दाखविण्यात आलेला आहे.[12]

**गुप्तेश्वर मंदीर**

गुप्त साम्राज्ञी प्रभावती गुप्ताची आठवण जागवणारी प्रभावती नगरी म्हणजे आजचे 'परभणी' शहर होय. राष्ट्रकुट, चालुक्य, यादव, स्थापत्याचा वारसा सांभाळणाऱ्या परभणी जिल्ह्यात, परभणी पासुन 32 कि.मी. अंतरावर असलेल्या धारासुर येथे गोदावरी नदीच्या र महाराष्ट्रातील अप्रतिम वास्तूस्थापत्य मंदिरावर चालुक्य शैलीचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. गजथर, पद्मथर, कुंभथर, कपोत आणि थर यांचे अस्तित्व दिसते. मंदिराचा मुखमंडप 7 फूट बाय 7 फूट या आकाराचा आहे. सभामंडप 24 फूट बाय 24 फूट असून 12 फूट बाय 12 फूट आकाराची रंगशिळा असून वर आलेल्या पद्मकमळाचे संकेत देतात. गाभाऱ्या समोर 8 फूट बाय 8 फूट



Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान
12 January 2019
ISSN- 2348-7143
UGC Approved No. 40705

या आकाराचे अंतराळ आहे. गर्भगृहाच्या द्वारपट्टीवरील ललाटबिंबावर गणेशमूर्ती असल्याने हे शिव मंदीर असल्याचा सबळ पुरावा आहे. इतर मंदीराप्रमाणे या मंदीराच्या बाह्यांगावर अप्रतिम शिल्पे कोरलेली आहेत. वामण, श्रीधर, ऋषीकेश, पद्मनाथ, दामोदर या मूर्तीही दिसतात. तसेच सुरसुंदरीचे सुंदर अंकण केलेले आहेत. या मूर्तीतील जीवंतपणा, गतिमानता, तालबध्द पदन्यास आणि अप्रतिम भावाविष्कार ही खरेतर शिल्पकारांची कसोटी म्हणावी लागेल, या कसोटीवर इथला शिल्पकार खरा उतरला आहे.[13] या मंदीरावरही एका उभ्या स्त्रीचे प्रसव शिल्प कोरण्यात आलेले आहे.[14]

**5. होट्टल**

देगलूर तालुक्यात (जिल्हा नांदेड) होट्टल गावात एकूण चार मंदिरे आहेत. सिध्देश्वर मंदीर, रेब्बेश्वर मंदिर, सोमेश्वर मंदिर आणि परमेश्वर मंदिर ही चारही मंदिरे अप्रतिम सौंदर्याने नटलेली आहेत. त्यातील सोमेश्वर मंदिर होट्टल गावाच्या पूर्वेकडील शेतात असून सद्या उद्ध्वस्थ होण्याच्या मार्गावर आहे. चालुक्यकालीन मंदीर स्थापत्याचा अविष्कार येथे पहावयास मिळतो. चालुक्य सम्राट विक्रमादित्य सहावा याच्या शिलालेखानुसार सोमेश्वर मंदिराचा उल्लेख 'त्रिपुरुष मंदिर' या नावाने केलेला आहे. मंदिर पश्चिमाभिमुख असून इ.सनाच्या बाराव्या शतकात चर्तुथकात सहाव्या विक्रमादित्याच्या कारकिर्दीत झालेले आहे. मंदिराचे मुखमंडप 5 फूट बाय 5 फूट आहे. तर मंडप 11 फूट बाय 12 फूट आहे. अंतराळ 7 फूट बाय 7 फूट आहे. तीन गर्भगृह असून मुख्य गर्भगृहाच्या ललाटबिंबावर गणेश असल्याने यात शिवलिंग असावे. दुसरे गर्भगृह विष्णूचे असून दक्षिणाभिमुख आहे. तर तिसरे गर्भगृह ब्रम्हाचे आहे. मंदिराच्या बाह्यांगावर सुरसुंदरी, विष्णू, नृसिंह, अंध:कासूरवध यांच्या मूर्तीसह प्रणयीशिल्पेही पाहावयास मिळतात.[15] या मंदिराच्या मुखमंडपाच्या उजव्या बाजूस खाली 9 इंच बाय 6 इंच आकारातील उभ्या अवस्थेत स्त्री प्रसवशिल्प कोरण्यात आलेले आहे.

मराठवाड्यातील वर उल्लेख केलेल्या पाच मंदिरावरील बाह्यांगावर उभे राहून प्रसूती होणाऱ्या स्त्री शिल्पाचे वेगळेपण हे आहे की, मंदीर हे केवळ धार्मिक क्षेत्र नसून त्यावर प्रतिबिंबित होणारे समाज जीवन ही पहावयास मिळते. कदाचित प्राचीनकाळी मराठवाड्यातील स्त्रिया उभ्या स्थितीतच अल्प प्रसूती कळा घेत मुलास जन्म देत असाव्यात. अशा काही प्रतिमा कर्नाटकातही सापडतात. परंतु त्या अल्प प्रमाणात आहेत. प्रा. डॉ. अशोक काळे, पुणे यांनी बस्तर (छत्तीसगड) मधील नक्षलवादी गावात दोन वर्षांच्या वास्तव्यात बहुसंख्य प्रसूती सिझर शिवाय घरोघरी कशा होतात. हे पाहण्यासाठी जात होते. डॉक्टर असल्याने त्यांना 'मुक्त प्रवेश' होता. या अदिवासी स्त्रिया छताला टांगलेली जाड दोरी धरुन, तर कधी खांब किंवा नात्यातील उभ्या असलेल्या स्त्रीच्या गळ्याला मिठी मारुन, इकडे तिकडे फिरता-फिरता आनंदाने कळा घेऊन प्रसूत होणाऱ्या महिला पाहिलेल्या आहेत. 'डॉक्टर या नात्याने प्रसूती शास्त्र नव्याने कळाले.' असे ते म्हणतात. मेडीकल कॉलेजात व खाजगी रुग्णालयात प्रसूती टेबलावर आडवे झोपून कळा घेतांना रडणाऱ्या, थकलेल्या, सिझरने सुटका करुन घेणाऱ्या महिला पाहिल्या होत्या. हा अनुभव डॉ. अशोक काळे यांनी सामाजिक आरोग्य विभागातील प्रा. डॉ. अनिल जुन्नरकर यांना सांगितला. तेंव्हा डॉ.जुन्नरकरांनी त्यांना मराठवाड्यातील गावात महिला उभ्या अवस्थेत प्रसूती कळा घेऊन कमी वेळेत, सहजतेने नैसर्गिरीत्या प्रसूत होत असल्याचे आढळल्याचे सांगितले. यावरुनच डॉ. जुन्नरकरांनी बसलेल्या स्थितीत कळा घेता येणारे नाविन्यपूर्ण प्रसूती टेबल बनविले होते. या टेबलाच्या डोक्यावरील अर्धाभाग वर करता येत असे. या शिवाय टेबलाच्या पायाकडील टोकाला अर्धवर्तुळाकार कमान होती. ज्याला पकडून पायाकडून कळा घेता येत असे. शास्त्रीय भाषेत प्रसूतीच्या उभ्या अवस्थेला Vertical Squatting Posture म्हणतात. या टेबलावर 1993 ते 1998 या दरम्यान 1040 महिलांची प्रसूती झाली. पैकी 1017 (97%) महिला नैसर्गिकरीत्या प्रसूत झाल्या. म्हणजे सिझेरीयन दर हा 3% असा होता. पुण्याच्या डॉ. जुन्नरकरांप्रमाणेच बेंगलोरच्या डॉ. गणपती यांनी संशोधन केले व ते 2012 साली (Journal of family Welfare, Vol 58) मध्ये प्रकाशित झाले. त्यांनी प्रसूती टेबलावर बळजबरीने झोपविलेल्या महिलेस जाळ्यात आडकलेला 'कीटक' ( Stranded Beetle) असे म्हटले आहे. त्यांच्या मते, प्रसूती टेबलावर आडवे झाल्यामूळे प्रसूती 'नैसर्गिक क्रिया' न रहाता 'वैद्यकीय हस्तक्षेप' होतो. इग्लंड मधील LANCET या सर्वात जुन्या वैद्यकीय साप्ताहिकाच्या 10 एप्रिल 1976 च्या अंकातील एका लेखात आडव्या (Dorsal Position) स्थितीत कळा घेतल्याने होणारे चार दुष्परीणाम सांगितलेले आहेत.

1. जननमार्ग ( Delivery Passage) अरुंद होतो.
2. कमरेच्या हाडाची हालचाल (Pelvic Mobility) रोखली जाते.
3. महाधमनी (Aorta) व महारोहिणी (Infvena Cava) दाबली जाते.
4. गुरुत्वाकर्षणाचा (Gravity) फायदा मिळत नाही.

या चारी घटनांचा एकत्रित दुष्परिणाम प्रसूती वर होतो. प्रसव - तास 30 टक्के वाढतात. शुध्द रक्तप्रवाह कमी झाल्याने बाळ गुदमरते. अशुध्द रक्तप्रवाह तुंबल्याने शक्तिपात होतो, धीर खचतो. या मुळे नातेवाईक घाबरुन सिझरचा आग्रह धारतात.[16] हे विश्लेषण पहाता मराठवाड्यातील मंदिरावर आढळणारे उभ्या अवस्थेतील स्त्री प्रसव शिल्पे ही स्त्रीस सुलभ प्रसूती साठी साह्यभूत असल्याचे दर्शवितात. प्राचीन वाङमयात उभ्याने प्रसूत झाल्याचा ज्ञात संदर्भ हा बुध्द जन्माचा आहे. शाल वृक्षाची फांदी धरुन लुंबिनी वनात महामाया (मायादेवी) उभी असतांनाच सहज कोणतीही वेदना न होता बुध्दाचा जन्म झाला होता.[14]

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, स्त्रीची नैसर्गिक प्रसूती ही गुरुत्वाकर्षणाच्या विरुध्द होता कामा नये. प्राचीन काळी मराठवाड्यातील स्त्रिया उभ्या अवस्थेत प्रसूतीकळा घेत प्रसूत होत होत्या. म्हणजेच स्त्रीयांना त्यांच्या इच्छेनुसार कळा घेण्याचे मुलभूत अधिकार अथवा स्वातंत्र्य असावे. त्यांना प्रसूती टेबलावर आडवे पडून कळा घेण्याची सक्ती नसावी. प्राचीन मूर्तीकलेचा अभ्यास करतांना



Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

प्रतिकांचा अन्वयार्थ लावल्यास तत्कालीन लोक जीवनाची प्रचिती येते. तसेच मराठवाड्यातील मंदिरे ही केवळ धार्मिक केंद्र नसून सामाजिक जीवनाचे दर्शन घडविणारे इतिहासाचे साक्षीदार आहेत हे सिध्द होते.

**संदर्भ**


1. पं. महादेवशास्त्री जोशी, भारताची मूर्तीकला, अनमोल प्रकाशन, पुणे, 1980, पृ. 01
2. पुष्पा त्रिलोकेकर, देवांची जन्मकथा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 2016, पृ. 06
3. डॉ. मारोती चव्हाण, होट्टल - एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, 2016, पृ. 56; पुष्पा त्रिलोकेकर, देवांची जन्मकथा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 2016, पृ. 23
4. डॉ. शरद सिंह, खजुराहो की मूर्तीकलाके सौंदर्यात्मक तत्व, विश्र्वविद्या प्रकाशन, वाराणसी,2006, पृ. 08
5. डॉ. रिता प्रताप, भारतीय चित्र कला एवं मूर्तीकला, राज्यस्थान ग्रंथ अकादमी, जयपूर, 2017, पृ. 09
6. डॉ. अजय परमार, प्राचीन भारतीय प्रतिमा कला एवं मंदिर वास्तूकला, विश्वभारती पब्लिकेशन, दिल्ली, 2011, पृ. 07
7. प्रा. कृष्णदास वाजपेयी, डॉ. प्रभाकर गद्रे, भारतीय वास्तू कलेचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2004, पृ. 01-02
8. श्री प्र. रा. अहिरराव, भारतीय मूर्तीपूजेचा इतिहास,वरदा बुक्स, पुणे, 2014, पृ. 03
9. डॉ. अनिल सिंगारे; डॉ. ओमशिवा लिगाडे, दक्षिण भारताचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, 2013, पृ. 138-139
10. दै. लोकमत, ले. साईली कौ. पलांडे, औरंगाबाद आवृती, 28 फेब्रुवारी 2018, (लो m.lokmat.com>blog>aurangabad)
11. दै. सकाळ, e-paper, रविवार, 23 डिसेंबर 2018.
12. m.maharashtratimes.com.25 jan 2017; पुरातत्व समन्वयक श्री मयुरेश खडके, औरंगाबाद यांनी दिलेली माहिती.
13. डॉ. प्रभाकर देव, (अनु. सौ. कल्पना रायरीकर), मराठवाड्यातील प्राचीन मंदिरे स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत , पुणे, 2017, पृ. 51-55
14. श्री लक्ष्मीकांत सोनवटकर यांच्या सौजन्याने.
15. डॉ. मारोती चव्हाण, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, 2016, पृ. 50-53
16. प्रा. डॉ. अशोक काळे, ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसाईक आणि संशोधक यांची फेसबुक वरील पोस्ट.
17. डॉ. रिता प्रताप, भारतीय चित्र कला एवं मूर्तीकला, राज्यस्थान ग्रंथ अकादमी, जयपूर, 2017, पृ. 532-533
18. फोटो सौजन्य-पुरातत्व समन्वयक श्री मयुरेश खडके आणि श्री कामाजी डक तसेच श्री लक्ष्मीकांत सोनवटकर आणि श्री ओजस बोरसे.




द्वार शिल्प




सोमेश्वर मंदिर होट्टल


धर्मापुरी


धर्मापुरी




आमलेश्वर मंदिर


धर्मापुरी

